14) नाटकातील व्यक्तिचित्रण व स्वभावरेखाटन
डॉ. संदीप अ. बनसोडे, औरंगाबाद. || 72

15) संत तुकारामांच्या अंधश्रध्देवर प्रहार
प्रा.डॉ.वैशाली भालसिंग, पारनेर || 75

16) खामगांवतील विविध संस्थांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य
प्रा. एस. पी. चव्हाण, बाळापूर, अकोला. || 81

17) अस्पृश्यांच्या स्वाभिमानी चळवळीचा मृत्यूलेख–पुणे करार
प्रा. डॉ. प्रदिप शा. ढोले, वरुड, ता. वरुड. जि. अमरावती || 86

18) भाषा व समाज
प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर, सिल्लोड, जि. औरंगाबाद || 89

19) तमाशा कलावंतांच्या संघर्षशील जीवनाचा वेध घेणारी कादंबरी:चंद्रमुखी
प्रा.यशवंत आबुवा हाके, बदनापूर, ता.बदनापूर, जि.जालना. || 93

20) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना : विशेष संदर्भ बीड जिल्हा
प्रा. जोशी राजकुमार लक्ष्मीकांत- प्रा. डॉ. महेश प्रभाकर देशमुख ||97

21) नाट्यसंहिता आणि रंगमंचीय आविष्कार
प्रा.डॉ.विजय विष्णुपंत केसकर, कळंब वालचंदनगर || 100

22) पंचायत राज आणि महिला सक्षमीकरण
प्रा. पी. एस. खोपे, कुरखेडा || 102

23) अन्न सुरक्षा व भारतीय शेतीवरील परिणाम
प्रा. डॉ. राजेंद्र एन.बोरसे, लोणार जि.बुलढाणा || 106

24) दारिद्र्य निर्मूलनात प्रशासनाची भूमिका
प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे), सोनपेठ जि.परभणी || 108

25) स्त्री शिक्षणाचा ऐतिहासिक आढावा
रविंद्र पाटील || 112

26) बहिणाबाई चौधरींच्या काव्यातील अध्यात्म व मानवता
प्रा. दिनेश हिंमतराव पाटील, भालोद, ता. यावल, जि. जळगांव || 116

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

14

# नाटकातील व्यक्तिचित्रण व स्वभावरेखाटन

डॉ. संदीप अ. बनसोडे,
द्वारकापुरी, एकनाथ नगर, औरंगाबाद.

मानवी स्वभावाचे गूढ हे कायम राहिलेले आहे. अनेक साहित्यकारांनी या मानवी मनाचा सुक्ष्म, सखोल आणि व्यापक वेध घेतला असला तरी मानवी स्वभाव व कृती याची संगती लावणे ही अवघड बाब आहे. प्रत्येक साहित्यकारापुढचे हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. मानवी मन हे इतके रहस्यमय व गहन गूढ आहे की, तो स्वतःलाच पूर्णपणे ओळखू शकत नाही. असंख्य अशा भावभावना मानवी मनावर राज्य करीत असतात. शांतता, विचारमग्नता, उत्साह, उदासीनता, प्रसन्नता, आनंद, अनावर हर्ष, धडकी, विषाद, खिन्नता, भय, विध्वंस, साशंकता, आशाआकांक्षा, क्रोध, दुःख, वेदना, आश्चर्य, तुटलेपणा, नम्रता, धास्ती कारूण्य, दहशत, खेद, तत्परता आणि आत्मीयता अशा निरनिराळ्या भावभावनांच्या गुंत्यात अडकून पडलेल्या माणसाला समजून घेऊन जीवनाचे मर्म शोधून काढण्याची ताकद साहित्यकाराजवळ असावी लागते. अशी ताकद असेल तरच तो उत्तम साहित्य निर्माण करू शकतो.

अशा उत्तम निर्मितीसाठी मग साहित्यीकाला गरज असते ती साहित्यसमावेशक व्यक्तिचित्रण आणि स्वभावचित्रणाची मग ही चित्रणे कुठे? कशी? कोणत्या ठिकाणी? आणि कोणत्या वेळी? वापरावयाची हे एकदा लक्षात आले की मग साहित्यीकाला सर्व काही मिळाल्याचा आनंद होतो साहित्यात व्यक्तिरेखा म्हणजेच व्यक्तिचित्रण व तिचे स्वभावचित्रण याला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. म्हणूनच O fDr fp=.k (Character) म्हणजे काय? आणि स्वभावचित्रण (Characterization) म्हणजे काय? हे सांगताना 'एन्साइक्लोपेडिया अमेरिकाना' मध्ये व्यक्तिचित्रण आणि स्वभावचित्रणाबाबत अशी माहिती मिळते की, वाङ्मयातील कादंबरी, लघुकथा, नाटक किंवा कवितेतील चित्रित व्यक्ती म्हणजे ते त्या व्यक्तीचे व्यक्तिचित्रण होय. व्यक्तिचित्रण ही संज्ञा काल्पनिक किंवा वास्तव व्यक्तींचे आवश्यक गुणविशेष किंवा वैयक्तिक धारणा दर्शविते. विश्वसनीय व्यक्तिचित्रण करणे हे साहित्यिकाचे उत्तम लक्षण आहे. वाङ्मयातील व्यक्तिचित्रण करताना काल्पनिक व्यक्तीची वृत्ती आणि वर्तन विश्वसनीय वाटेल अशा प्रकारे सादर केले जाते. स्वभावचित्रण हे नाटक, कथा कादंबरी आणि निवेदनात्मक कवितेचे अद्वितीय लक्षण आहे. असे म्हटले आहे.

याबाबत भरतमुनी यांचा विचार केला तर त्यांनी नाट्यशास्त्रात नाटकाची वस्तू, नेता आणि रस अशी तीन महत्त्वाची तत्त्वे सांगितली आहेत. कथावस्तू ही नायकाभोवतीच फिरत राहते. रसप्रक्रियेचा पहिला भाग 'विभाव' आहे आणि नायकच त्याचा आश्रय आहे. म्हणजेच नाटकाचा प्रमुख, नायक किंवा नेताच आहे. नाटकाचे बीजही नायकातच असते. नाटकातल्या कथेला आणि कार्याला गतिशीलता देणाराही तोच असतो आणि शेवटी फल उपभोगणाराही तोच असतो. म्हणूनच भारतीय नाट्यशास्त्राने नायकाचे श्रेष्ठत्व निर्विवादपणे मान्य केले आहे आणि त्याच्या स्वभावचित्रणाला सर्वाधिक महत्त्व दिले आहे.

नाटककाराने कथावस्तुचा कितीही अभ्यास केला असला तरी ती कथा ज्याच्यावर घटित होते त्या व्यक्तीचे गुण, स्वभाव, दोष आणि काही वैशिष्ट्ये या साऱ्या गोष्टींचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे, असे भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात सांगितले आहे. नायकाने कसे असावे याबद्दल काही नियम घालून दिले आहेत. नायकाला अतिमानवी किंवा दैवी दाखवून चालणार नाही, त्याने 'लोकवृत्तानुकरणी' असले पाहिजे. नाटककार हा सृष्टिकर्ता असला तरी तो निर्जीव सृष्टिकर्ता आहे त्याला सजीव सृष्टीत फेरबदल करण्याचे अधिकार नाहीत. भरतमुनींनी साधारणपणे स्त्री पुरुषात भिन्न



Scanned by CamScanner

भिन्न स्वभाव कसे दिसून येतात, त्यांच्यात काय विशेषत्व आहे, याचे यथासांग वर्णन केले आहे. पुरुष मुळत: तीन प्रकारचे असतात, उत्तम, मध्यम आणि अधम. भरतमुनींच्या मते नायक उत्तम प्रकृतीचा असावा, शोभा, विलास, माधुर्य, गांभीर्य, स्थैर्य, तेज, ललित आणि औदार्य हे आठ सात्विक गुण त्याच्यापाशी असले पाहिजेत. पुरुषांप्रमाणे नायिकाही उत्तम प्रकारचीच असली पाहिजे असे भरतमुनी म्हणतात.

पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी स्वभावचित्रण करताना लेखकाला तीन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. असे सांगितले आहे त्या म्हणजे,

**१) विचार–विचारांच्या रांध्यातून मानवरेखा तयार करणे.**

**२) विख्यात काळ, प्रांत व वर्ग यांची वैशिष्ट्ये भरणे.**

**३) इतरांपेक्षा वेगळी स्वतंत्र अशी विशिष्ट वळणे भरणे.**

वरील तीन गोष्टी केल्यावरच व्यक्तिचित्रणाला सुघटित असा आकार येऊ शकतो असे सहस्त्रबुद्धे म्हणतात. लेखकाच्या अवलोकन शक्तीने व्यक्तिचित्रणात जितका भरता येईल तितका हालचालींचा तपशील, शरीराची ठेवण, मनातली गुंतागुंत, कृती याचे वर्णन केल्यास व्यक्तिचित्रण जास्त सजीव होते. काळ, प्रांत, वर्ग, कृती, राहणी, विचार, मनोरचना, भाषापद्धती व विशिष्ट हालचाल ही व्यक्तिचित्र अथवा व्यक्तिरेखा निर्माण करण्याची नऊ साधने आहेत. कलाकृतीतील व्यक्तिचित्रण करताना लेखक या सगळ्या घटकांचा जाणीवपूर्वक विचार करतोच असे नाही पण मार्गदर्शक तत्वे म्हणून लेखकाने या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्यांच्या मते चरित्रचित्रणाच्या दोन पद्धती आहेत.

१) **निवेदन पद्धती:–** व्यक्तीचा स्वभाव कसा आहे किंवा होता याचे निवेदन लेखकाकडून किंवा इतर पात्रांकडून केले जाते.

२) **दर्शन पद्धती:–** व्यक्तीची प्रत्यक्ष कृती दाखवून त्यातून तिच्या स्वभावावर प्रकाश टाकण्याच्या पद्धतीला 'दर्शन पद्धती' असे म्हणतात. या पद्धतीत प्रसंगी स्वगताचाही विचार केला जातो. व्यक्तीच्या स्वभावाची यथार्थ कल्पना येण्याच्या दृष्टीने, कथानकाला गतिशीलता प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने, विश्वसनीयता वाढविण्याच्या हेतूने निवेदन पद्धतीपेक्षा दर्शन पद्धतीच जास्त श्रेष्ठ आहे. या दोन्ही पद्धतींचा उपयोग करूनही स्वभावचित्रण केले जाते. उदा.वि.वा.शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' या नाटकात गणपतराव (अप्पा) बेलवलकर यांची प्रत्यक्ष कृती तर दाखवलीच आहे. ही साकार करताना श्रीराम लागू यांनीही आपल्या अभिनयाचा कस लावलेला आहे. याबाबत तर असंही म्हटलं गेलं की, 'नटसम्राट' हे नाटक म्हणजे एकखांबी तंबूसारखे आहे. श्रीराम लागू नसते तर हा तंबू कधीच उभा राहू शकला नसता.

कुणी घर देता घरकू एका तुफानाला कुणी घर देत का? घर., एक तुफान भिंतीवाचून, छपरावाचून, माणसाच्या मायेवाचून, देवाच्या दयेवाचून जंगला जंगलात हिंडतय. जिथून कुणी उठवणार नाही, अशी एक जागा धुंडतय. कुणी घर देता का? घर.., खरं सांगतो बाबांनो तुफान आता थकून गेलयं. झाडाझुडपात, डोंगरदऱ्यात अर्धअधिक तुटून गेलयं समुद्राच्या लाटावरती वनव्याच्या जाळावरती झेपझुंजा घेऊनं घेऊनं.. तुफान आता खचूनं गेलयं, जळके तुटके पंख पालवीत खुरडत खुरडत उडतंयकुरखरं सांगतो बाबांनो तुफानाला तुफानपणाच नडतंय, कुणी घर देता का? घर.., तुफानाला महाल नको, राजवाड्याचा सेट नको, पदवी नको, हार नको, थैलीमधली भेट नको. एक हवयं लहान घर पंख मिटून पडण्यासाठी आणि एक हवीय आरामखुर्ची तुफानाला बसण्यासाठी आणि विसरू नका बाबांनो एक.. एक तुळशी वृंदावन हवयं. मागल्या अंगणात सरकारसाठी. सरकार..सरकार.. (रडत)

वरील संवादावरून आपल्याला लक्षात येते की, अप्पासाहेब बेलवलकर हे आपल्या जीवनात कशा प्रकारे जीवन जगलेले आहेत. कुणी घर देता का? घर.... या त्यांच्या संवादावरून आपल्या तारूण्यात ते कशा प्रकारे वादळी व्यक्तिमत्वाचं जीवन जगले, याची पुसटशी का होईना परंतु आपणास कल्पना येते. म्हणजेच पु.ग.सहस्त्रबुद्धे यांनी सांगितलेल्या दर्शन पद्धतीनुसार नाटकातील पात्राचे स्वगत हे व्यक्तीच्या स्वभावाची यथार्थ कल्पना येण्याच्या दृष्टीने, कथानकाला



Scanned by CamScanner

गतिशीलता प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने, विश्वसनीयता वाढविण्याच्या हेतूने निवेदन पद्धतीपेक्षा दर्शन पद्धतीच जास्त श्रेष्ठ कशी ठरते हे लक्षात येते. अशा प्रकारे व्यक्तिचित्राचे स्वभावचित्रण करताना प्रत्येकाला जाणवलेल्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यावर प्रत्येकाने भर दिला आहे. यावरून स्वभावचित्रणाची पुढील वैशिष्टे लक्षात येतात. नायकाची सर्वगुणसंपन्नता, औचित्य, जीवनानुकूलता, एकरूपता, संभाव्यता, सुसंगती, व्यक्तिचित्राचा पूर्ण परिचय, जिवंतपणा, मानसिकता, शारीरिक आणि सामाजिक दर्जा, तर्कसंगती, विश्वनीयता, विश्वासार्हता, गोलाई किंवा व्यामिश्रता, सपाटपणा, विचार–विकारांच्या संघ्यातून निर्माण झालेली मानव रेखा, दृढनिश्चय, धैर्य, उत्कटता, आकर्षकता, स्पष्टता, कथानक आणि व्यक्तिरेखाटनातले एकजिवित्व, व्यक्तिविशेष आणि व्यक्तीचे इतरांशी असलेले आंतरिक संबंध, तन्मयता, अलिप्तता, सखोलता, उत्तुंगता, घनता, सार्वत्रिकता आणि सार्वकालिकता.

याशिवाय यशस्वी स्वभावचित्रणासाठी नाटककाराला आणखी काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. जसे नाटकात पहिल्या काही दृश्यातच चित्रित व्यक्तीची अगदी थोडक्यात आणि सहज ओळख करून द्यावी आणि एकदा तिला प्रस्थापित केल्यावर शेवटपर्यंत प्रेक्षकांचा तिच्यातला रस आणि विश्वास टिकवून धरावा. व्यक्तिचित्राच्या वागण्यात सुसंगती असावी, पण ही सुसंगती फार आखीवरेखीव नसावी. प्रेक्षकांना तिच्याबद्दल विश्वास वाटावा पण पुढे ती व्यक्ती काय करेल याचा अंदाज त्याला बांधता येवू नये. उलट पुढे ती काय करेल याबद्दलची त्याची उत्सुकता वाढवली गेली पाहिजे.

प्रेक्षकांच्या विश्वासाविरुद्ध जरी त्या व्यक्तीचे वर्तन असले तरी त्यात एक अंतर्गत सुसंगती असली पाहिजे आणि शेवटी प्रेक्षकांचे समाधान झाले पाहिजे म्हणजेच विश्वास आणि अविश्वासाचा योग्य तो मेळ घातला जावा. इतरांशी असलेल्या संबंधातून ते व्यक्तिचित्र स्पष्ट होणे आवश्यक असते म्हणूनच दुय्यम व्यक्तिचित्राच्या स्वभावचित्रणाकडे दुर्लक्ष करता कामा नये. नाटकाच्या अंतिम उद्दिष्टासाठी या दुय्यम व्यक्तिचित्राचा हातभार लागला पाहिजे. त्याचबरोबर दुय्यम व्यक्तिचित्राचे स्वभावचित्रण वाजवीपेक्षा जास्त चांगले होता कामा नये. त्यामुळे मुख्य व्यक्तिचित्रावरचे प्रेक्षकांचे लक्ष ढळते. हे टाळावे यासाठी मुख्य आणि दुय्यम व्यक्तिचित्राचा मेळ घातला जाणे आवश्यक आहे.

व्यक्तिचित्र एकच जरी असले तरी त्याच्यात निरनिराळ्या प्रवृत्ती वास करत असतात. लेखकाने त्याच्या अंतरंगात शिरून त्याच्या निरनिराळ्या प्रवृत्तीचा अर्थ लावावा तरच ते व्यक्तिचित्र त्याच्या असल स्वरूपात प्रेक्षकांसमोर उभे राहू शकते. प्रेक्षकांची सहानुभूती व्यक्तीला मिळण्यापेक्षा व्यक्तीच्या उद्देशाला मिळावी. लेखकाने व्यक्तीचे असे चित्रण केले पाहिजे की, प्रेक्षकाने व्यक्तिचित्रापेक्षा त्याच्या उद्दिष्टाशी समरस झाले पाहिजे तरच व्यक्तिचित्राबरोबर जगणे प्रेक्षकला सोपे जाते. व्यक्तिचित्राला कसला तरी असाध्य असा ध्यास लागला पाहिजे. त्या ध्यासातून त्याच्या प्रगल्भतेचा आणि माणुसकीचा प्रत्यय यावा. येणे करून असाध्य ध्यास आणि व्यक्तिचित्राची जिद्द यामुळे नाटकातील ताणतणाव वाढत जाऊन शेवटी मिळणारे समाधान मोठ्या प्रमाणात मिळेल.

**संदर्भ**

१. Encyclopeadia Americana, International Edition Vol. 6
२. J.A. Cuddon, A Dictionary of Literary terms, Andre Deutsh publication
३. 'नाटक रंगाविष्कार आणि रंगाविष्कार' ('नटसम्राट':शोकात्मिका जागवणं/जगणं) ले. डॉ.व.दि.कुलकर्णी, प्रथमावृत्ती, पद्मगंध प्रकाशन, पुणे.
४. 'नटसम्राट' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ४०००३४
५. वि.भा.देशपांडे नाटककार खानोलकर, नूतन प्रकाशन, पुणे, १९७८
६. शर्मा सुरजमल, 'हिन्दी नाटक मे पात्रकल्पना और चरित्रचित्रण', एस.इ.एस.कंपनी, १९७३

□□□



Scanned by CamScanner